# प्रेस नोट दि-१३/१०/२०१७

दिनांकः-१०/१०/२०१७ रोजी दुपारी ३.१५ वा.चे सुमारास फिर्यादी श्रीमती सुनंदा अशोक पोळ, वय ६५ वर्षे, रा.फ्लॅट नं.२०३,एस.बी. आंगन,सर्वे नं.५१/२३७,गणपती मंदिरा शेजारी, भैरवनगर, धानोरी रोड, पुणे ह्या लेन नं-७ रोडवरुन पायी जात असताना त्यांचे समोरुन एक अनोळखी इसम मोबाईलवर बोलत गेला व परत फिर्यादीचे पाठीमागुन येवून त्यांचे गळयातील एक सोन्याचे मिनी मंगळसूत्र त्यांना धक्का देवून जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन पळुन गेला. त्याबाबत विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं-३५६/१७ भादवि कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये संशयीत आरोपी ज्या भागातुन पळुन गेला त्या परिसरातील लोकांचे तसेच बातमीदारांचे माहीतीवरुन सहा.पो.निरीक्षक श्री माने, पो.हवा.सुनिल खंडागळे, पो.शि अशोक शेलार व प्रितम जंगम यांनी कसोशिने तपास करुन आरोपी नामे-गोविंद उर्फ नागेश यमनाप्पा गायकवाड वय-३० रा.स.नं-४६ भिम नगर धानोरी रोड विश्रांतवाडी पुणे यास निष्पन्न करुन त्याचा शोध घेवुन एकता नगर झोपडपट्टी विश्रांतवाडी पुणे येथे तो असल्याची माहीती मिळाल्यानंतर आरोपीस शिताफिने पकडून ताब्यात घेवुन आरोपीकडे तपास करता, त्याने सदरचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झालेने त्यास दि-११/१०/२०१७ रोजी १७.०० वा.अटक करण्यात आली. तपासामध्ये त्याचेकडून गुन्ह्यातील जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेलेले सोन्याचे मिनी मंगळसुत्र दिड ताळे वजनाचे जप्त करुन २४ तासाचे आंत गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

मा.श्री दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त सो परि-४ पुणे, श्री गणेश गावडे, सहा.पो.आयुक्त सो खडकी विभाग पुणे, श्रीमती संगीता पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक सुरेश माने, कर्मचारी सुनिल खंडागळे, अशोक शेलार, प्रितम जंगम, अनिकेत भिंगारे व वामन सावंत यांनी कामगीरी केली आहे.